**Impact Factor – 6.625** **ISSN – 2348-7143**

**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**Peer Reviewed & Indexed Journal**

**October-2019 Special Issue – 198**

# गांधी विचारधारा एवं ग्रामस्वराज की संकल्पना

अतिथि संपादक :
डॉ. अजयकुमार मोहबंसी
प्राचार्य,
कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय,
पेट्रोलपंप जवाहरनगर,
त. जि. भंडारा

विशेषांक संपादक
डॉ. राजेंद्रप्रसाद पटले
कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय, पेट्रोलपंप जवाहरनगर,
त. जि. भंडारा

विशेषांक सहसंपादक
डॉ. आर. आर. चौधरी
डॉ. हरगोविंद टेंभरे

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**
For Details Visit To : www.researchjourney.net

**© All rights reserved with the authors & publisher**

**Price : Rs. 800/-**

| | | | |
|---|---|---|---|
| 36 | महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना | डॉ.संजय अवधूत | 146 |
| 37 | गांधीजी आणि स्वराज्य | डॉ.साधना जिचकार | 148 |
| 38 | राष्ट्रपिता आणि ग्रामीण विकासाची संकल्पना | डॉ.रविंद्र मोहतुरे | 151 |
| 39 | म.गांधीजी संकल्पित हिंद स्वराज्य ग्राम – स्वराज्य | डॉ.मुकुंदा मेश्राम | 156 |
| 40 | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार | डॉ.मनीषकुमार कायरकर | 162 |
| 41 | महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक विचार | राजेंद्र घोरपडे | 169 |
| 42 | महात्मा गांधींचे शिक्षणविषयक विचार : एक दृष्टीक्षेप | प्रा.ईश्वर वाघ | 172 |
| 43 | महात्मा गांधींच्या पंचायतराज विचारधारेतील भारत | प्रा.विनोद मुडे | 175 |
| 44 | महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता | सुनिल घुगल | 180 |
| 45 | महात्मा गांधींचे हिंदस्वराज्य व आजचा भारत | श्री.सुनिल राजपुत | 187 |
| 46 | ग्रामीण विकासात महात्मा गांधींच्या विचारांची भूमिका | प्रा.अंकोश चवरे | 190 |
| 47 | ग्रामीण अर्थव्यवस्थेसंबंधी महात्मा गांधींचे विचार | डॉ.हरिदास लाडके | 197 |
| 48 | गांधीजीच्या तत्त्वज्ञानातील आदिवासी संस्कृतीचा शाश्वत विकास | प्रा.किशोर नैताम | 199 |
| 49 | महात्मा गांधीच्या कल्याणकारी आर्थिक विचारांची समर्पकता | प्रा.हितेश दडमल | 207 |
| 50 | ग्रामीण विकासाबाबत गांधीजींचे विचार | प्रा.सतिश जाधव | 212 |
| 51 | महात्मा गांधी व असहकार चळवळ | डॉ.प्रमिला भोयर | 217 |
| 52 | राष्ट्रपिता महात्मा गांधीची ग्रामीण विकास संकल्पना | डॉ.रत्नपाल डोहणे | 223 |
| 53 | महात्मा गांधी आणि स्वतंत्रता आंदोलन | डॉ.लोमेश्वर घागरे | 226 |
| 54 | गांधीवाद आणि मराठी साहित्य | डॉ.विनोद भालेराव | 229 |
| 55 | महात्मा गांधी जगाला अहिंसा व सहिष्णुता प्रदान करणारा माणूस | डॉ.अशोक भक्ते | 231 |
| 56 | महात्मा गांधी : माणुसकीचे तत्त्वज्ञान | डॉ.विठ्ठल मंदुलवार | 234 |
| 57 | पर्यावरण संरक्षण व गांधी विचारधारा | डॉ.चंदु पाटील | 238 |
| 58 | महात्मा गांधींची ग्रामस्वराज्य संकल्पना | डॉ.जयदेव देशमुख | 241 |
| 59 | महात्मा गांधीजींची स्वराज्य संकल्पना | डॉ.श्रावण कापगते | 245 |
| 60 | महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार आणि वर्तमान शिक्षण प्रणाली | डॉ.नवनाथ तुपे | 249 |
| 61 | वर्तमान शिक्षण व्यवस्था आणि गांधी विचार | प्रा.ममता राऊत | 253 |
| 62 | गांधींचे ग्रामस्वराज्याविषयीचे विचार | डॉ.सरला मेश्राम | 256 |
| 63 | महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांची आवश्यकता | डॉ.वामन खोब्रागडे | 259 |
| 64 | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार | डॉ.विठ्ठल ठावरी | 262 |
| 65 | राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार | प्रा.मुरलीधर नाकाडे | 266 |
| 66 | गांधीजी आणि स्वतंत्रता आंदोलन | कु.क्रिष्णा पासवान | 269 |
| 67 | महात्मा गांधी व सर्वोदय | प्रा.चंद्रशेखर भेजे | 273 |
| 68 | म.गांधीजींची आर्थिक विचारधारा एक विकासाची गुरुकिल्ली | प्रा.विजय दरवडे | 278 |
| 69 | व्यसनमुक्ती आणि महात्मा गांधी | प्रा.नरेश आंबिलकर | 282 |
| 70 | महात्मा गांधीचे सर्वोदयासंबंधीचे विचार | प्रा.रमेश धोटे | 286 |
| 71 | महात्मा गांधी व सर्वोदय | प्रा.सुभाष गोंडाणे | 289 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 198 : गांधी विचारधारा एवं ग्रामस्वराज की संकल्पना
ISSN : 2348-7143
October-2019

# महात्मा गांधींची ग्रामस्वराज्य संकल्पना

प्रा. डॉ. जयदेव पुं. देशमुख
सहयोगी प्राध्यापक,
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय,
देसाईगंज, जिल्हा : गडचिरोली

**"खेडे हा भारताचा पाया आहे, खऱ्या भारताचे दर्शन खेडयामध्येच होईल. खेडे हा राष्ट्राचा मुख्य आधार आहे. खेडयातच भारतरूपी शरिराचा आत्मा राहतो."** अशी महात्मा गांधीजींची खेडयाप्रती धारणा होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील स्वराज्य म्हणजे ग्राम स्वराज्य होय. ग्राम स्वराज्यामध्ये ग्रामीण समाजाच्या म्हणजेच ग्रामांच्या स्वयंपूर्णतेला विशेष महत्व असेल. ग्राम स्वराज्यामध्ये ग्रामीण जनतेच्या गरजांची पुर्तता करण्यासाठी आवश्यक सर्व वस्तूंचे उत्पादन खेडयातच झाले पाहिजे. यामुळे ग्रामीण जनतेला गावातच रोजगार उपलब्ध होईल. त्यांच्या गरजा पुर्ण करण्याइतपत उत्पन्न प्राप्त होईल. उत्पादनाची साधने ग्रामीण जनतेचीच असल्याने गरजे पुरतेच उत्पादन घेतले जाईल व शोषनाचे प्रतीक समजले जाणारी भांडवलशाहीला आळा बसेल. म्हणूनच गांधीजींनी हाक दिली की, "खेडयाकडे चला." खेडी स्वयंपुर्ण झाली तर ती समृध्द व संपन्न होतील, पर्यायाने राष्ट्र समृध्द व संपन्न होईल. देशाचा विकास साधण्यासाठी संपूर्ण ग्रामीण म्हणजेच खेडे विभाग विकसित होणे गरजेचे आहे, **"खेडयांचा विकास म्हणजेच देशाचा विकास होय."** अशी महात्मा गांधींजींची धारणा होती. सध्या ग्रामीण भागात विविध समस्या आहेत. दिवसेंदिवस खेडी ओस पडत आहेत. बेकारी, व्यसनाधिनता, नैतिक अधःपतन यात प्रचंड वाढ होत आहे. या सर्व समस्यांवर एकच उपाय आहे तो म्हणजे महात्वा गांधीजींनी ग्रामीण जीवना संबंधीचे जे विचार मांडले त्यांची अंमलबजावणी करणे होय.

स्वातंत्र्य प्राप्तीपुर्वीच राष्ट्रीय विकास साध्य करण्यासाठी महात्मा गांधींजींनी ग्रामीण क्षेत्राचा (खेडयांचा) जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज असल्याचे सांगितले होते. आजही देशातील प्रत्येक शहरातील वाढत चाललेली गर्दी, रोजगाराचा प्रश्न, गुन्हेगारी यासारख्या अनेक समस्यांवर **"खेडयाकडे चला"** हा महात्मा गांधीजींचा संदेश आर्थिक समस्यांचे निराकरण करण्याचेच मार्ग सुचवितो. आजही देशातील मोठी लोकसंख्या ग्रामीण क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेवर अवलंबून असल्याचे निदर्शनास येते. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधा ग्रामीण भागात निर्माण करणे व प्रत्येक गांव स्वयंपूर्ण करणे आवश्यक आहे. महात्मा गांधीजींच्या कल्पनेप्रमाणे जर प्रत्येक गांव स्वयंपूर्ण झाले तर आपल्या देशाला आर्थिक विकास साध्य करणे करणे सहज शक्य आहे.

ग्रामीण विकासाला भारतासारख्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत महत्व प्राप्त होते. भारत हा खेडयांचा देष आहे हे भारताचे महत्वाचे वैशिष्टये आहे. भारताचे खरे चित्र आजही खेडयातूनच पहावयास मिळते. आजही 70 टक्के लोकसंख्या खेडयांमध्येच आहे. भारताची आर्थिक परिस्थिती, धार्मिक किंवा रूढी परंपरा, समाज व्यवस्था, जातीय व्यवस्था, प्रगत व मागासलेपणा हया सर्व गोष्टींचे दर्शन खेडयातूनच होते. एवढया मोठया खंडप्राय देशात अगदी मोजक्याच शहरांचा समावेश होतो, तेव्हा भारतातील ग्रामीण भागाचा म्हणजेच खेडयांचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. एवढया मोठया प्रमाणात ग्रामीण भागामध्ये लोकसंख्या असेल तर खेडयांचा विकास झाला तरच भारताचा विकास झाला असे म्हणावे लागेल.